# प्रथम वर्ष बी.टेक/एम.टेक/एमसीए आणि थेट द्वितीय वर्ष बी.टेक प्रवेश प्रक्रिया




**Ă आम्ही रोख रक्कम, चेक अथवा डीमांड ड्राफ्ट स्विकारत नाही.**

**√ आम्ही फक्त ऑनलाईन पेमेंटच स्विकारतो.**

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

विद्यार्थ्यांने मिळालेला प्रवेश निश्चीत करण्यासाठी संस्थेच्या एमआयएस सॉफ्टवेअर मध्ये ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना सुचीत करण्यात येते की, खाली दिलेल्या क्रमानुसार मुळ कागदपत्रे छायांकीत दोन प्रतीच्या वेगवेगळ्या संचासह तपासण्यासाठी घेऊन यावे.

**टेबल १ : प्रथम वर्ष बी.टेक/एम.टेक/एमसीए आणि थेट द्वितीय वर्ष बी.टेक प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांचा क्रम**

टिप - **अ.क्र. १ ते १० मधील कागदपत्रे सर्व विद्यार्थ्यांनी जोडणे आवश्यक आहे.**
**अ.क्र. ११ व १२ मधील कागदपत्रे सर्व मागास वर्गीय विद्यार्थ्यांनी जोडणे आवश्यक आहे.**
**अ.क्र. १३ मधील कागदपत्र अनुसुचित जाती / जमातीचे विद्यार्थी सोडून सर्व मागास वर्गीय विद्यार्थ्यांनी जोडणे आवश्यक आहे.**
**अ.क्र. १४ मधील कागदपत्र TFWS कोठ्यामधून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी जोडणे आवश्यक आहे.**
**अ.क्र. १५ व १६ मधील कागदपत्रे फक्त एम.टेक / एमसीए शाखेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी जोडणे आवश्यक आहे.**

| अ. क्र. | कागदपत्रे | शेरा | संच - १ प्रवेशासाठी | संच -२ पात्रतेसाठी |
|---|---|---|---|---|
| १ | Provisional Allotment Status Form generated in Candidates login | संकेतस्थळा वरील प्रिन्ट | संकेतस्थळा वरील प्रिन्ट जोडणे | संकेतस्थळा वरील प्रिन्ट जोडणे |
| २ | Receipt-Cum-Acknowledgement of Seat Acceptance Form | संकेतस्थळा वरील प्रिन्ट | संकेतस्थळा वरील प्रिन्ट जोडणे | संकेतस्थळा वरील प्रिन्ट जोडणे |
| ३ | Certificate of Indian Nationality in the Name of the Candidate | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| ४ | Domicile/Birth/Leaving certificate of candidate Indicating place of Birth in the Maharashtra state | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| ५ | Statement of Marks or Certificate of Passing SSC / Equivalent Examination. | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| ६ | Statement of Marks or Certificate of Passing HSC or Diploma | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| ७ | MHT-CET Score Card or GATE Score Card | संकेतस्थळा वरील प्रिन्ट | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | Bank Account Passbook of Candidate | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | - |
| ९ | Aadhaar Card | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १० | Leaving/Transfer Certificate issued by the previous institute | - | मुळ कागदपत्र जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| ११ | Caste Certificate of the Candidate for all Reserve Category Candidates | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १२ | Caste/Tribe Validity Certificate of Candidate for all Reserve Category Candidates | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १३ | Non-Creamy Layer Certificate for OBC/SBC/NT/VJ Category Candidates | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १४ | Income Certificate of Parents for TFWS (If Applicable) | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १५ | Statement of Marks of Degree of all years/semesters for M.Tech/MCA admission | मुळ कागदपत्र दाखविणे | छायांकीत प्रत जोडणे | छायांकीत प्रत जोडणे |
| १६ | Migration Certificate for M.Tech/MCA Admission | प्रवेश निश्चीत केल्यानंतर एक महिन्याच्या आत मुळ कागदपत्र जमा करणे | | |

## <u>प्रवेश प्रक्रिया</u>

प्रथम वर्ष बी.टेक/एम.टेक/एमसीए आणि थेट द्वितीय वर्ष बी.टेक मध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी खालील क्रमानुसार प्रवेश निश्चीत करणे आवश्यक आहे.

१. प्रथम वर्ष बी.टेक/एम.टेक/एमसीए आणि थेट द्वितीय वर्ष बी.टेक मध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चीत करणे करिता स्वतः टेबल क्रमांक १ मध्ये दिलेल्या क्रमानुसार कागदपत्राच्या मुळ व छायांकीत प्रतींच्या दोन संचासह (एक संच प्रवेश निश्चीती साठी व एक संच शिवाजी विद्यापिठास पात्रतेसाठीचा फॉर्म पाठविण्यासाठी) विद्यार्थी विभागामध्ये हजर राहणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांने विद्यार्थी विभागातील लिपीकाकडून संस्थेच्या एमआयएस सॉफ्टवेअर मध्ये प्राथमिक स्वरुपाची माहिती भरुन वसतिगृहामध्ये राहणार आहे किंवा कसे याबाबत माहिती द्यावयाची आहे.

३. विद्यार्थी विभागातील लिपीक प्राथमिक स्वरुपाची माहिती भरल्यानंतर एमआयएस सॉफ्टवेअर द्वारे एक रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड तयार करेल. सदरचा रजिस्ट्रेशन व पासवर्ड तसेच संस्थेच्या आवारामध्ये Cyberoam द्वारे इंटरनेट वापराकरिताचा लॉगीन आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या इ-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर पाठविला जाईल.

४. विद्यार्थ्यांने सदर रजिस्ट्रेशन व पासवर्ड द्वारे संस्थेच्या एमआयएस सॉफ्टवेअर (https://mis.gcekarad.ac.in) मध्ये लॉगीन करुन दिलेला पासवर्ड बदलणे अनिवार्य आहे.

५. विद्यार्थ्यांनी इंटरनेट बॅकींगद्वारे अथवा क्रेडीट/डेबीट कार्ड वापरून संस्थेच्या एमआयएस सॉफ्टवेअर मधील लॉगीनद्वारे प्रवेशाकरीता आवश्यक असलेली फी भरावी.

६. प्रवेश फी यशस्वीरीत्या भरल्यानंतर विद्यार्थ्यांने ग्रंथालयामध्ये फोटो व सहीचा नमुना देणे आवश्यक आहे.

७. विद्यार्थ्यांने एआरसी अधिकाऱ्यांकडून ऑनलाईन प्रवेश निश्चीतीकरण करुन घ्यावे. प्रवेशाचे ऑनलाईन निश्चीतीकरण झाल्यानंतर एआरसी अधिकाऱ्यांकडून एमआयएस सॉफ्टवेअर द्वारे निर्मीत अॅडमिशन कन्फरमेशन रिपोर्टची एक प्रत व रिसिप्ट कम अॅक्नॉलेजमेंट ऑफ कन्फरमेशन ऑफ अॅडमिशन ची एक प्रत प्राप्त करून घ्यावी.

८. वरील प्रवेश प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांने ग्रंथालयात भेट देऊन आपले ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे.

९. विद्यार्थ्याने शिवाजी विद्यापिठाचा प्रात्रता फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थी विभागातील प्रात्रता विभागास भेट द्यावी.

१०. विद्यार्थ्याने संस्थेचे संकेत स्थळ http://gcekarad.ac.in तसेच https://mis.gcekarad.ac.in या वेबसाईटवर वेळोवेळी भेट देऊन आवश्यक त्या नोटीसेस तसेच अपडेट्स प्राप्त करुन घ्यावेत.

## ऑनलाईन फी ची रक्कम स्विकारण्याच्या पद्धती

### इंटरनेट बँकिंग, क्रेडिट/डेबीट कार्ड द्वारे केलेल्या व्यवहारावर कोणतेही शुल्क नाही

विद्यार्थ्यांने खाली दिलेल्या तक्त्यातील कोणत्याही एका बँकेची इंटरनेट बँकींग अथवा क्रेडीट/डेबीट कार्ड सुविधा वापरून फी भरावी.

१. इंटरनेट बँकींग (शिफारस केलेल्या)

| बँकेचे नांव | बँकेचे नांव | बँकेचे नांव |
|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | आय सी आय सी आय बँक | एच डी एफ सी बँक |
| कोटक महिंद्रा बँक | ॲक्सिस बँक | आय डी बी आय बँक |
| महाराष्ट्र बँक | बँक ऑफ बरोदा | बँक ऑफ इंडिया |
| एअरटेल पेमेंट बँक | आन्ध्रा बँक | बंधन बँक |
| बँक ऑफ बहरिन व कुवेत | कॅनरा बँक | कॅथलिक सिरीयन बँक |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | सिटी युनियन बँक | कार्पोरेशन बँक |
| कॉसमॉस बँक | डी बी एस बँक लि. | डी.सी.बी.बँक |
| डिसचे (Deutsche) बँक | धनलक्ष्मी बँक | फेडरल बँक |
| आय डी एफ सी बँक | इंडियन बँक | इंडियन ओव्हरसिज बँक |
| इंडसइंड बँक | जनता सहकारी बँक, पुणे | कर्नाटका बँक |
| करुर वैश्य बँक | लक्ष्मी विलास बँक | ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स |
| पंजाब नॅशनल बँक | आर.बी.एल.बँक | सारस्वत बँक |
| शामराव विठ्ठल बँक | साऊथ इंडियन बँक | स्टॅन्डर्ड चार्टर्ड बँक |
| सिंडीकेट बँक | तमिळनाड मर्चन्टाईल बँक | युको बँक |
| युनियन बँक ऑफ इंडिया | युनायटेड बँक ऑफ इंडिया | येस बँक |

**१. क्रेडीट कार्ड स्विकारतो**

| | |
|---|---|
| **क्रेडीट कार्ड ब्रँड** | VISA, MasterCard, RuPay, AMERICAN EXPRESS, Diners Club |

**२. डेबीट कार्ड स्विकारतो**

| | |
|---|---|
| **डेबीट कार्ड ब्रँड** | VISA, MasterCard, Maestro, RuPay |
| **शेरा** | डेबीट कार्ड चे दैनंदिन व्यवहाराची मर्यादा त्या त्या बँकेने किंवा त्या त्या कार्ड देणाऱ्या कंपन्यानी ठरविलेली असते. काही डेबीट कार्डचे दैनंदिन व्यवहाराची मर्यादा रु. २५,०००/-, ५०,०००/- किंवा रु. ७५,०००/- पर्यंत अडवलेली असते.<br>विद्यार्थी / पालकांनी सल्ला देण्यात येतो की, त्यांनी आपल्या प्रवेशाची फी रक्कम भरणे इतपत कार्डची मर्यादा आहे किंवा नाही हे प्रथम चेक करावे. |

## सतत विचारण्यात येणारे प्रश्न

प्र. १) **माझ्याकडे ऑनलाईन फी भरण्याची कोणतीही सुविधा नाही जसे की इंटरनेट बँकिंग किंवा डेबीट/क्रेडीट कार्ड. तर मला कशी फी भरता येईल?**

उत्तर - तुम्ही एचडीएफसी चलन द्वारे फी भरु शकता. हे चलन एमआयएस सॉफ्टवेअर मधून तीन प्रतीमध्ये तयार होते सदरचे चलन एचडीएफसी बँकेमध्ये रोखीने भरावे. चलनाची एक प्रत रोखपाल विभागाकडे जमा करावी. चलनाने फी भरण्याची सुविधा फक्त प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील. **आम्ही रोख रक्कम, धनादेश, डीडी, एनईएफटी, आरटीजीएस द्वारे भरलेल्या फी स्विकारत नाही.**

**प्र. २) मला माझ्या फी ची रचना कशी कळेल? किंवा मला किती फी भरावी लागेल?**

उत्तर - संस्थेने प्रत्येक प्रवर्गानुसार व विद्यार्थ्याच्या प्रकारानुसार फी ठरविलेली असते. विद्यार्थी विभाग त्या त्या विद्यार्थ्याचा फी कोड सॉफ्टवेअर मध्ये सेट करतो त्यानुसार त्या विद्यार्थ्याला फी भरणे आवश्यक असते.फी रचना संस्थेच्या संकेत स्थळावरील Admission मेनु मध्ये दिसेल.

**प्र. ३) मला वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी वेगळा फॉर्म भरावा लागेल का?**

उत्तर - नाही. तुम्हाला वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी कोणताही वेगळा फॉर्म भरावा लागणार नाही. फक्त तुम्ही प्रवेश निश्चीतीच्या वेळी एमआयएस सॉफ्टवेअर मध्ये माहिती भरताना विद्यार्थी विभागाच्या लिपीकास वसतीगृहामध्ये प्रवेश घेणार असल्याचे सागांवे लागेल.

**प्र. ४) मला या संस्थेतील प्लेसमेंट बाबतची सांखिकीय माहिती कशी मिळेल?**

उत्तर – खाली दिलेल्या लिंक वरील प्लेसमेंट टॅबवर या संस्थेतील प्लेसमेंट बाबतची सांखिकीय माहिती मिळेल

**http://gcekarad.ac.in**